अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जावक क्र. : अतिमआ/साप्रवि/आस्था-४/ ७६४
दिनांक : २७/०४/२०२२

**-: कार्यालयीन आदेश:-**

विषय : पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करणेबाबत.

संदर्भ : १) कामगार कल्याण विभाग जा.क्र.एलओ/५४ दि. १८/०४/२०१६
२) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा. क्र. अतिमआ(ज)/एलओ/३८६ दि.१६/०७/२०१६
३) सामान्य प्रशासन कार्यालय, जा. क्र. साप्रवि/आस्था/२६५२ दि.०१/०१/२०१८

पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील विविध हुद्यांवरील सेवकांचे सुधारित गणवेश नियमावलीनुसार गणवेश निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने संबंधित सेवकांनी कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. सुधारित गणवेश नियमावलीनुसार अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील, अग्निशमन विभागाकडील इ. कार्यालयात काम करणारे सेवक व शिपाई संवर्गातील सेवक इ. सेवकांना गणवेश अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित सेवकांनी गणवेश परिधान करणेबाबत संदर्भ क्र. १ व २ अन्वये प्रशासनाकडून आदेश प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तथापि त्याप्रमाणे कर्मचारीवर्ग गणवेश परिधान करीत नसल्याने नागरिकांना महापालिका कर्मचारी व नागरिक यामध्ये फरक लक्षात येत नाही अशा तक्रारी प्राप्त होत आहेत.

त्यानुषंगाने या कार्यालयीन आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) गणवेश अनुज्ञेय असणाऱ्या प्रत्येक सेवकाने गणवेश स्वच्छ व नीटनेटका ठेवणे व कर्तव्यावर असताना परिधान करणे हे त्या सेवकाचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने खातेप्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखालील विभागामधील सेवकांच्या गणवेशाची तपासणी करावी.

२) तसेच श्री. नितिन केंजळे, कामगार अधिकारी यांनी स्वतःचे पदाचे कामकाज सांभाळून संदर्भ क्र. ३ चे आदेशान्वये प्रकरणी तपासणी करणेबाबतचे कामकाज करावे. त्याचबरोबर संबंधित विभागांचे खातेप्रमुख / प्रशासन अधिकारी / अधिक्षक व इतर संबंधित वरिष्ठ नियंत्रक अधिकारी यांनी देखील त्यांचे नियंत्रणाखालील कर्मचारी हे गणवेश परिधान करतील, याची दक्षता घ्यावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
27/4/2022

प्रत :- मा. सर्व संबंधित खातेप्रमुख / विभागप्रमुख/ प्रशासन अधिकारी
पुणे महानगरपालिका

3 \\10.3.112.69\Google Drive BACKUP\office\Ganvesh\Ganvesh Letter.docx